# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

विषय : मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार आयोजित करण्यात आलेल्या मुलाखतींच्या सर्वसाधारण गुणवत्ता यादी व निवड यादीबाबत.

संदर्भ : मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.२६२१/२०२५ व इतर संबंधित याचिकांमध्ये दिलेला दिनांक ०८/०९/२०२५ चा निर्णय.

प्राप्त झालेल्या आदेशानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.२६२१/२०२५ व इतर संबंधित याचिकांमध्ये दिनांक ०८/०९/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगर या संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयातील अनुदानित विविध १४ विषयांच्या ४७ सहायक प्राध्यापक पदांकरिता मुलाखती विद्यापीठातील सेट अभ्यागत निवास येथे दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५ ते १२ डिसेंबर, २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या होत्या. मुलाखतीकरिता एकूण ९५२ उमेदवारांना उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आलेले होते. त्यापैकी एकूण ५६२ पात्र उमेदवारांच्या मुलाखती निवड समितीद्वारे घेण्यात आल्या.

सदर कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या मुलाखतींच्या अनुषंगाने सर्वसाधारण गुणवत्ता यादी व निवड यादी तयार करण्याचे प्रशासकीय कामकाज करण्यात आलेले असून सदर याद्या अंतिम करण्यात आलेल्या आहेत. निवड यादीनुसार एकूण ४५ उमेदवारांची निवड यादी तयार करण्यात आलेली आहे. सोबत सर्वसाधारण गुणवत्ता यादी व निवड यादीच्या प्रती जोडल्या आहेत.

16/12/25

प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे,
प्रभारी कुलसचिव

संदर्भ क्र.सीसीओ/ 5209
दि.१६/१२/२०२५.

सोबत : सर्वसाधारण गुणवत्ता यादी व निवड यादी.